e-ISJN: A4372-3088
p-ISJN: A4372-3089

ISSN: 2394-3122 (Online)
ISSN: 2394-6253 (Print)
Impact Factor: 6.03

Volume 11, Issue 12, December 2024

SK International Journal of Multidisciplinary Research Hub

Journal for all Subjects

Research Article / Survey Paper / Case Study

Published By: SK Publisher

(www.skpublisher.com)

*A Monthly Double-Blind Peer Reviewed Refereed Open Access Multidisciplinary & Multilingual International Journal*

Special Issue: National Interdisciplinary Conference on "Women Empowerment: Issues, Challenges and Solutions"

Organised by: Department of Political Science & I. Q. A. C., Shankarlal Khandelwal Arts, Science & Commerce College, Akola, Maharashtra 444002.

(Sponsored by PM-UShA Grants to Strengthen Colleges)

# स्त्रीवाद आणि भारतातील सामाजिक व राजकीय सुधारकांची महिला सक्षमीकरणातील भूमिका

**सारंग राजेंद्र धारस्कर**[१]
संशोधक विद्यार्थी
राज्यशास्त्र विभाग
शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालय, अकोला

**प्रा. डॉ. अरुण मुकुंदराव शेळके**[२]
संशोधक मार्गदर्शक
राज्यशास्त्र विभाग
शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालय, अकोला

**DOI:** https://doi.org/10.61165/sk.publisher.v11i12.104

**प्रस्तावना**

भारताला वैचारिक संपन्न समाज सुधारकांचा समृद्ध असा वारसा लागला. त्यांच्या आधुनिक विचारांमुळे समाज जीवनात मोठ्या प्रमाणात बदल घडवून आला. शिक्षणाचा प्रसार जसजसा वाढू लागला; तसा माणूस हा साक्षर होऊ लागला. समाजाकडे पाहण्याची दृष्टी बदलली. स्वातंत्र्य भारतात नागरिकाला संविधानाने अनेक अधिकार दिले व भारतीय स्त्री पुरुष समानता निर्माण केली. यामध्ये अनेक सामाजिक व राजकीय सुधारकांनी मोलाचे कार्य केले. स्वातंत्र्यपूर्व व नंतर स्त्रियांच्या हक्कासाठी अनेक सुधारकांनी चळवळी केलेल्या आपणास दिसून येतात.

स्वातंत्र्य, समता, बंधुता या तत्त्वांनी ज्यावेळी समाजव्यवस्था चालते ती खऱ्या अर्थाने सुखकर होते असे भारतीय संस्कृती मान्य काही केले आहे. याच चिंतनातून स्त्री-पुरुष समानतेचे तत्व आपण जेव्हा विचारात घेतो त्यावेळी पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्रीची होणारी कुचंबना या विषयावर बोलणे अपरिहार्य ठरते. माझ्या मते, निसर्गाने स्त्रियांना काही बाबी दिल्या आहेत आणि समाजाकडून काही बाबी तिला प्राप्त झाल्या आहेत. निसर्गाने दिलेल्या बाबी बदलणाऱ्या नाहीत. समाजाने तिला प्रदान केलेल्या बाबी सन्मानीय आहेत तर काही बाबी अन्यायकारक असल्याचे दिसून येते. अन्यायकारक गोष्टी काढून टाकणे म्हणजे स्त्रीवाद होय. परंपरागत विचार मूल्य कल्पना आणि त्यातून निर्माण झालेले स्त्री प्रतिमा या स्त्री प्रतिमेला छेद देणारे नवे विचार स्त्रीवादी विचारांची प्रस्तुत केले. कारण ती काळाची गरज होती.

*© 2024, SK Publisher All Rights Reserved* 

विविध देश, विविध संस्कृती, सामाजिक विचार मंथनातील बहुविविधता त्यामुळे प्रत्येक देशातील स्त्रीमुक्तीच्या संकल्पनेत अपरिहार्यपणे फरक पडत गेला. त्यासंबंधी ध्येय, उद्दिष्टे यामध्ये विचारांचा फरक पडला. परंतु मुख्य स्रोत समान राहिला. स्त्रीचे गौणत्व, स्त्री पुरुष

असमानता, स्त्रीचे खुरटे व्यक्तिमत्त्व, आत्मसन्मान, विकासाची संधी याबद्दलच्या अपेक्षा सारख्या राहिल्या. जागतिक पातळीवरील विचारांचा प्रभाव भारतीय जीवनावरही झाला. भारतीय विचारवंत स्त्रियांना पाश्चात्य स्त्री मुक्तीच्या विचारप्रवाहांची ओळख झाली. आपल्या देशातील स्त्रियांच्या प्रश्नांची विचारपूर्वक उकल केली. भारतीय जीवन पद्धतीच्या पार्श्वभूमीवर स्त्री मुक्तीच्या चळवळी भारतात निर्माण झाल्या. त्यामुळे भारतीय स्त्रियांच्या समस्याचे नवे भान आले. आणि त्याविरुद्ध लढण्यामधील अडचणी लक्षात आल्या व त्यातून स्त्रीमुक्ती ही संकल्पना विस्तृत बनली.

**स्त्रीवाद**

स्त्रीवाद ही एक विचार प्रणाली आहे. याचा खऱ्या अर्थाने उदय नवउदारमतवादी तत्त्वविचारांमधून झालेला दिसतो. पुढे अनेक विचारप्रणालीने स्त्रीवादी विचार मांडलेले आपल्याला दिसून येतात. स्त्रीवाद हा feminism हा शब्द फ्रेंच मधील 'feminisme' या शब्दावरून वापरात आणला गेला. आणि 1890 नंतर हा शब्द प्रचलित होत गेला. 'मेरीयम-वेबस्टर डिक्शनरी' नुसार स्त्रीवाद हा लिंगाचे राजकीय, आर्थिक आणि सामाजिक समानतेचा सिद्धांत मांडतो. आणि तो स्त्रियांचे हक्क आणि हितसंबंध जोपासण्यासाठी काम करतो. काही अभ्यासकांच्या मते, स्त्रीवाद ही धारणा आहे; जी स्त्रियांना पुरुषांसारखेच अधिकार, सत्ता आणि संधी मिळायला हव्यात आणि त्यांना समान वागणूक मिळावी यावर विश्वास ठेवतात. स्त्रीवाद लिंग समानता आणि त्यांना समान संधी याविषयी भाष्य करतो. स्त्रीवाद हा केवळ स्त्रियांच्या समस्या, प्रश्न याविषयी मांडणी करत नाही; तर समाजातील शोषित, वंचित घटकांच्या हक्कांविषयी, लिंगभाव सत्तासंबंध, शोषणाच्या विविध संस्थांच्या विरोधात जशी कि पितृसत्ताक, भांडवलशाही, वर्ग, वर्णव्यवस्था, जातीव्यवस्था, इत्यादी संदर्भात मांडणी करतो. बहुतांश लोकांना स्त्रीवाद हा केवळ स्त्रिया त्यांचे प्रश्न याविषयी मांडणी करतो. आणि हा विचार प्रवाह पुरुषांच्या विरोधात आहे असे वाटते; मात्र असे काही नसून स्त्रीवाद हा समाजातील असमान सत्तासंबंधांना आव्हान देतो.

**बेल हुक्स** (1984)- स्त्रीवाद ही लिंगभेद, लिंग आधारित दमण आणि शोषण संपवण्यासाठी उभी केलेली चळवळ आहे.

**मॅगी हम** (1992)- स्त्रीवाद ही ऐतिहासिक दृष्ट्या भिन्न आणि सांस्कृतिक दृष्ट्या वेगळी असलेली आंतरराष्ट्रीय चळवळ आहे.

**सुमित्रा भावे** - स्त्रीवाद हा वाद शब्दामुळे बंदिस्त होतो त्यामुळे स्त्रियांच्या समानतेसाठी केलेली चळवळ हा स्त्रीवाद होय.

**सुमती लांडे** - स्त्री-पुरुषांनी स्वतंत्र व्यक्ती म्हणून सन्मानाने जगण्यासाठी सर्व सामाजिक संस्थांचा केलेला पुनर्विचार आणि पुनर्रचना म्हणजे स्त्रीवाद.

© 2024, SK Publisher All Rights Reserved

स्त्रीवाद या विचारधारांमध्ये उदारमतवादी, मार्क्सवादी, जहाल, समाजवादी, काळा स्त्रीवाद, दलित स्त्रीवाद, इत्यादी अनेक स्त्रीवादी विचारधारांचा समावेश होतो. स्त्रीवादी या फक्त स्त्रियांच असतात असं नाही तर पुरुष, तृतीयपंथी हे देखील स्त्रीवादी असतात.

स्त्रीवादाची मुख्य तीन प्रवाहात विभागणी केली आहे. पहिली लाट 19 व 20 व्या शतकाच्या पूर्वार्धापर्यंत दिसून येते. यात स्त्रियांच्या मतदानाविषयी लढा उभारला गेला. दुसरी लाट 1960 मध्ये उदयास आली. यामध्ये स्त्रियांमधील भिन्नत्व यावर प्रकाश टाकत पितृसत्ता, लिंगभाव, समांतर खाजगी व सार्वजनिक अवकाश, भांडवलशाही इत्यादीवर भर दिला गेला. तिसरी लाट ही सत्तरच्या दशकात पहिल्या आणि दुसऱ्या लाटेतील मर्यादा अधोरेखित करत उदयास आली. भारताच्या संदर्भात या लाट आणि स्त्री आणि स्त्रीवादी चळवळीचा उगम वसाहती काळ, स्वातंत्र्य काळ आणि समकालीन टप्पा असा समजून घेता येईल.

स्त्रीवाद मध्ये असणारे विविध प्रवाह पुढे बघू.

**उदारमतवादी स्त्रीवाद:-**

17 व्या शतकात ही विचारप्रणाली समोर आली. मेरी वॉलस्टोनक्राफ्ट (1992) यांनी लिहिलेल्या 'अ विंडीकेशन ऑफ द राइट्स ऑफ विमेन्स' या पुस्तकात उदारमतवादी स्त्रीवादी मांडणी केली आहे. समाजामध्ये स्त्रियांची परिस्थिती बदलण्यासाठी उपाययोजना व सुधारणा सुचवतो. स्त्रियांना समान संधी मतदानाचा हक्क, शैक्षणिक आणि कायदेशीर सुधारणा या मधून स्त्रीपुरुषमध्ये समानता येईल. ही विचारसरणी व्यक्तिवाद व स्वायत्तता याला जास्त महत्त्व देते. सर्वांना स्वातंत्र्य व निवडीचा अधिकार यावर भर देते. उदारमतवादी स्त्रीवादी मध्ये, समाजात असलेली असमानता ही नैसर्गिक नसून रचीत आहे. त्यामुळे सार्वजनिक क्षेत्रांमध्ये आर्थिक व शैक्षणिक संधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. या विचारसरणीमध्ये कोलस्टोनक्राफ्ट, बेटी फ्रीडन, जॉन स्टुअर्ट मिल, हॅरिएट टेलर, एलिझाबेथ कॅडी स्टॅंटन, इत्यादी विचारकांचा समावेश होतो.

**मार्क्सवादी स्त्रीवाद:-**

भांडवलशाही ही व्यवस्था जाऊन मालक - मजूर एक पातळीवर येऊन त्याच्या समान संपत्तीचे व सत्तेचे वाटत व्हावे अशी आदर्शवादी भूमिका मार्क्सने मांडली. त्याच तत्त्वावर स्त्री - पुरुष कुटुंब व्यवस्थेत ज्यावेळी स्त्रियांवरील पुरुषांचे मालकी व सत्ता नष्ट होईल. त्यावेळी खऱ्या अर्थाने स्त्री मोकळी होईल अशी संकल्पना मार्क्स व एंगेल्सने मांडली.

जमीन, सरंजामशाही सत्तासंबंध, विनावेतन यातून लिंग आधारित शोषण कसे होते; हे मार्क्सवादी स्त्रीवादी सांगतो. कुटुंब, विवाह, खासगी मालमत्ता हे शोषणाचे केंद्र असल्याचे 'झेटकिंग' म्हणतात. भांडवलशाही कडून स्त्रियांच्या पुनरुत्पादन क्षमतेचे, शरीराचे व लैंगिक इच्छांचे नियंत्रण शोषण होते. अलेक्झांड्रा कोलंताई (1977) म्हणतात, भांडवलशाहीमध्ये स्त्रिया ह्या वर्गामध्ये विभागलेले आहे. मार्क्सवादी स्त्रीवादी पुनरुत्पादनाकडे स्त्रियांचे शोषण आणि दमण म्हणून बघतात. मार्क्सवादी जास्ती करून आर्थिक पैलुंवर भर देतो. या विचारामध्ये शैला रॉबॅथम, हेडी हार्टमन, मिशेल बॅरेट, कॅथरीन मॅक्सिनन, इत्यादींचा समावेश होतो.


Special Issue: National Interdisciplinary Conference on "Women Empowerment: Issues, Challenges and Solutions"
Organised by: Department of Political Science & I. Q. A. C., Shankarlal Khandelwal Arts, Science & Commerce College, Akola, Maharashtra 444002.
(Sponsored by PM-UShA Grants to Strengthen Colleges)

**जहाल स्त्रीवाद:-**

हा विचारप्रवाह महत्वपूर्ण असून सामाजिक रचनेत क्रांतिकारक बदल घडवून आणण्यासाठी प्रयत्न करतो. यांच्या मते, स्त्रियांच्या शोषणाला पितृसत्ता जबाबदार आहे. आणि स्त्रियांच्या शोषणातून पुरुषांना फायदा होतो. स्त्रिया या शोषित गट आहे. आणि प्रत्येक समाजात त्यांचे शोषण दिसून येते. त्यांच्या मते, पितृसत्ता ही हिंसेच्या माध्यमातून प्रस्थापित होते. उदा., लैंगिक अत्याचार, पोर्नोग्राफी, वैश्याव्यवसाय, स्त्री भ्रूणहत्या, सती, इत्यादि जहालवादी स्त्रीवाद असे मानतो. स्त्री मुक्ती घडवून आणायची असेल तर पितृसत्तेला आव्हान निर्माण करणे आणि तिचे निर्मूलन करणे आवश्यक आहे. या विचारवंतानी केवळ सार्वजनिक जसे की, शाळा, कॉलेज, कामाची ठिकाणे, इ. ठिकाणी असणारे पुरुषांचे वर्चस्व यावर चर्चा केली नाही; तर अवकाशातील पुरुषांच्या मक्तेदारीवर व दैनंदिन हिंसेवर देखील प्रश्नचिन्ह उपस्थित केले. स्त्रियांचे शोषण संपवायचे असेल तर संरचनात्मक बदल घडवून आणावे लागतील.  या विचारांमध्ये सीमोन द बुआ, अड्रिया डॅवर्किन, कॅथरीन मॅकिनन, शुलामिथ फायरस्टोन, इत्यादी विचारवंतांचा समावेश होतो.

**काळा स्त्रीवाद:-**

20 व्या शतकाच्या मध्यास काळात स्त्रीवाद एक महत्त्वाचा विचार बनला. हा शोषणाला विरोध करतो व काळ्या स्त्रियांच्या सामाजिक अन्याविरुद्ध लढण्यास सक्षम करतो. अमेरिकन समाजातील मूलभूत विरोधाभास जसे की एकीकडे समानता, लोकशाही मूल्ये, स्वातंत्र्य, सामाजिक न्याय, याविषयी मुख्यप्रवाही स्त्रीवादी बोलतात. आणि दुसरीकडे असमानता पाळतात, वंश, वर्ग, लिंग, लैंगिकता, आणि नागरिकत्वाच्या आधारावर भेदभाव करताना दिसून येतो. काळा स्त्रीवाद अस्तित्वात येण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे काळ्या स्त्रियांना मुख्यप्रवाहातील गोऱ्या स्त्रीवादी आपले प्रश्न, अनुभव, व्यथा समजून घेत नाही व मांडत नाही.  यांच्या मते, गोऱ्या स्त्रियांचे दैनंदिन अनुभव सामाजिक स्थान हे त्यांच्या(काळ्या) अनुभवापेक्षा व स्थानापेक्षा वेगळे आहे. काळ्यांचे गुलामीचे अनुभव, सामाजिक भेदभाव, हिंसा, सामूहिक मारहाण, नरसंहार आणि राज्यांकडून होणारे दमण हे अनुभव काळ्यांना त्यांच्या वर्णामुळे अनुभवास येतात. काळ्या स्त्रियांचे अनुभव मांडण्यास योग्य संधी न मिळाल्याने त्यांनी आपले अनुभव वेगळ्या पद्धतीने मुख्यप्रवाही स्त्रीवादी गटांच्या सोबत न जाता मांडण्यास सुरुवात केली.

काळ्या स्त्रीवादांनी वूमनिझम, काळा राष्ट्रवाद, ग्रे मुक्ती अशा महत्वपूर्ण बाबीवर प्रकाश टाकतात. या विचारसरणीमध्ये बेल हुक्स, किंबरले, ॲर्डे लुर्द, पॅट्रिशिया हिल, नेल्सन मंडेला, कॉलिन्स इत्यादि विचारवंतांचा समावेश होतो.

**दलित स्त्रीवाद:-**

90 च्या दशकात दलित स्त्रीवादाबाबत विचारविमर्श होण्यास सुरुवात झाली.  मुख्य प्रवाही स्त्रीवादी चळवळ ही उच्च जाती व मध्यम वर्गीय असून दलित प्रश्नांवर व कृतीवर भर  देत नाही असे दलित स्त्रियांनी अधोरेखित केले. दलित स्त्रियांचे शोषण हे त्यांच्या जातीमुळे होते असा युक्तिवाद त्यांनी केलेला दिसून येतो. जाती व्यवस्था व पितृसत्ता ही स्त्री शोषणाची मूलभूत व्यवस्था आहे. त्यामुळे स्त्रीमुक्ती घडवून आणायची असेल तर जाती व्यवस्था व पितृसत्ता नष्ट करावी लागेल. सवर्ण स्त्रियांची व

© 2024, SK Publisher All Rights Reserved

दलित स्त्रियांचे शोषण वेगवेगळ्या पद्धतीने होते असे त्यांनी मांडले. 90 च्या दशकात दलित स्त्रियांच्या वेगवेगळ्या संघटना उदयास आल्या. तसेच शाहू, फुले, आंबेडकरी जाती अंताच्या चळवळीच्या स्त्रियांच्या सहभागाची पार्श्वभूमी या विचारधारेला आहे.

मीनाक्षी मून व उर्मिला पवार (2008) अधोरेखित करतात की डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जाती अंताच्या चळवळीमध्ये मोठ्या प्रमाणात दलित स्त्रियांच्या सहभाग होता. 1996 मध्ये गोपाल गुरु यांनी 'दलित वूमन टॉक डिफॅरेटरी हा लेख लिहला.

दलित स्त्रीवाद हा आधुनिक असला तरी याची पाळे मुळे शाहू, फुले, आंबेडकर चळवळीत सापडतात. यांच्या मध्ये स्त्रिया ह्या जाती व्यवस्थेचे प्रवेश द्वार असून जातीय अवस्था टिकवण्यासाठी स्त्रियांच्या लैंगिकतेवर विविध मार्गाने नियंत्रण ठेवले जाते, त्यामुळे स्त्री प्रश्न व जातीचा प्रश्न वेगळा वाटता येत नाही.

दलित स्त्रीवादावर सैद्धांतिकरित्या व विशेषणात्मकरित्या वादविवाद सुरू आहे. तसेच वेगवेगळ्या साहित्यातून चर्चा होणे आवश्यक आहे.

स्त्रीवादामध्ये वेगवेगळे विचार प्रवाह उदयास आले आहे. यामध्ये आणखीन

1) आधुनिकोत्तर स्त्रीवाद

2) उत्तर आधुनिक्तावादी स्त्रीवाद

3) समाजवादी स्त्रीवाद इतर प्रकारचे स्त्रीवाद दिसून येतात.

**भारतातील सामाजिक व राजकीय सुधारकांची महिला सक्षमीकरणातील भूमिका.**

**महात्मा फुले :-**

विद्येविना मती गेली ।
मतीविना नीती गेली ।
नीतीविना गती गेली ।
गतीविना वित्त गेले ।
वित्ताविना शूद्र खचले।
इतके अनर्थ एका अविद्येने केले ।।

पुण्यात जोतिराव फुले यांनी आपल्या पत्नीसमवेत उचललेले स्त्री शिक्षणाचे पाऊल फारच महत्त्वपूर्ण ठरले. फुले यांनी आपले संपूर्ण जीवन समाजसुधारणेसाठी समर्पित केले होते. त्यांनी समाजातील अस्पृश्यता, उपेक्षित समाज घटकांवर होणारा अत्याचार व अन्याय, शैक्षणिक विषमता, स्त्रियांवर होणारे सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक व शारीरिक अत्याचार, इत्यादी महत्त्वाच्या प्रश्नांना वाचा फोडली. फुले दांम्पत्याने स्त्रीशिक्षणला दिलेले महत्त्व लक्षात घेता 'शिक्षण' हे प्रत्येक व्यक्तिला सर्वार्थाने 'सक्षम', सुशिक्षित व सुसंस्कृत बनवू शकते याचे प्रबोधन पुर्ण विश्वासाने समाजात पसरविले. विद्येचे शस्त्र प्रत्येकाने हाती घ्यावे त्यासाठी

पुण्यासारख्या ठिकाणी 1848 मध्ये मुलींसाठी शाळा, दलितांसाठी रात्रीचे शिक्षण वर्ग सुरु केले. निरक्षरता हे गुलामगिरीचं मुळ कारण असल्याने त्यांनी मागासवर्गीयांसाठी विविध ठिकाणी शैक्षणिक संस्था स्थापन केल्या. माणूस हा जन्माने वा जातीने नव्हे तर, आपल्या कर्तुत्वाने श्रेष्ठ-कनिष्ठ ठरत असतो, हा विचार त्यांनी रयतेला दिला. सामाजिक व आर्थिक विषमतेवर आधारित समाजव्यवस्थेला झुगारून समतेवर आधारित नवसमाजाची निर्मिती करण्यासाठी फुलेंनी 'सत्यशोधक समाज' ची स्थापना केली. प्रस्थापित समाजव्यवस्थेकडून होणारे बालविवाह, विधवांचे केशवपन, स्त्रियांवर होणारे लैंगिक अत्याचार, या व अशा अनेक स्त्रीप्रश्नांवर फुले यांनी आपले लक्ष केंद्रित केले. त्याला अनुसरुनच त्यांनी समाज व धर्माला त्या विरोधात परखड प्रश्न विचारण्याचे आत्मभान स्त्रियांमध्ये यावे यासाठी शिक्षणाच्या माध्यमातून स्त्रियांना सक्षम बनविण्याचे प्रयत्न केले. त्यांच्या त्या अथक प्रयत्नामधूनच त्यांची पत्नी सावित्रीबाई फुले, फातिमा शेख, मुक्ता साळवे यांसारख्या महिला सक्षमीकरणाचे उदाहरण म्हणून पुढे येताना दिसतात.

**पंडिता रामाबाई:-**

पंडिता रमाबाई यांचा जन्म कर्नाटकातील मंगळूर जिल्ह्यात गंगमूळ येथे 1858 साली झाला. पंडिता रमाबाईंचे वडील अनंत शास्त्री डोंगरे हे विद्वान गृहस्थ म्हणून प्रसिध्द होते. अनंत शास्त्रीनां स्त्री शिक्षणाची प्रबळ इच्छा होती. त्यांनी आपल्या पत्नीस संस्कृत शिकविण्यास सुरुवात केली होती. त्यांनी अनेक स्मृती पुराणातून स्त्रियांना शास्त्राध्ययन करण्याचा अधिकार आहे हे दाखवून दिले. त्यांनी पंडीतांबरोबर वाद प्रतिवाद केला होता. पंडिता रमाबाई म्हणतात, वाद घातल्यानंतरही माझ्या वडिलांना कोणी जाती बाहेर टाकले नाही की कोणी त्रास दिला नाही. माझ्या वडीलांनी अशी खात्री करुन दिली की स्रियांनी व शुद्रांनी पुराणातील संस्कृत वाङःमय शिकणे यात काही वाईट नाही. एक सनातनी धर्म सुधारक म्हणून त्यांची प्रसिध्दी झाली.

सप्टेंबर 1882 मध्ये पुण्यात हंटर कमिशन आले होते. त्यावेळी पं. रमाबाईनी महत्वाची साक्ष दिली. कमिशन पुढे त्यांनी स्त्री शिक्षणाची स्थिती मांडली होती. त्यांनी स्त्री शिक्षण विषयक काही सुचना मांडल्या होत्या. मुलींच्या शाळावर स्त्री शिक्षिकाच असावी. मुलींना व शिक्षिकांना राहण्यासाठी स्वतंत्र वसतीगृह असावे. वैद्यकीय मदत असावी, स्त्री इन्स्पेक्टर्सच असाव्यात या सूचना रमाबाईनी केल्या होत्या. त्यांची साक्ष त्या काळात खूपच गाजली. पं. रमाबाईनी विधवा स्त्रियांची स्थिती जाणली होती. निराधार विधवा स्त्रियांना जगता येण्यासाठी आश्रम उभा करुन परिचारिका व शिक्षिकेचा व्यवसाय यांचे शिक्षण मिळाले पाहिजे, यासाठी त्या धडपडत होत्या. त्या साठी वेगवेगळे प्रयत्न केलेले दिसून येतात. त्यांनी ‘शारदा सदन’ हे महिलांसाठी स्थापन केले.

**पंडिता रमाबाई रानडे:-**

फुले यांचा वसा यशस्वीपणे पुढे नेताना स्वतः पासूनच शिक्षणाला सुरुवात करून स्त्री शिक्षणासाठी 'सेवा सदन', 'हिंदू सोशल अँड लिटररी क्लब', यांसारख्या सामाजिक व शैक्षणिक संस्था स्थापन करण्यापर्यंतचा प्रवास हा नक्कीच स्त्री सक्षमीकरणाला अधोरेखित करतो, स्वतःच बालविवाहाची शिकार ठरलेल्या रमाबाई पती महादेव रानडे यांच्या निधनानंतर समाजातील

SK International Journal of Multidisciplinary Research Hub
Volume 11, Issue 12, December 2024 pg. 533-540

कुप्रथांविरोधी वेगवेगळ्या व्यासपीठांवरून कणखर भूमिका घेऊ लागल्या. स्त्री गुन्हेगारांचे पुर्नवसन व बाल गुन्हेगारांना समुपदेशन करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य त्यांनी केले.

पुण्यात पहिले मुलींचे हायस्कूल हुजुरपागा येथे स्थापन केले.

**महर्षि धोंडो केशव कर्वे :-**

स्त्री शिक्षणाचे अग्रणी, विधवा पुर्नविवाहाचे कृतीशील पुरस्कर्ते, मानवीसमतेचे आग्रही, राष्ट्र उभारणीत स्त्रीशक्तीच्या सहभागाची आवश्यकता अधोरेखित करणारे, तसेच, बहुजन व उपेक्षित घटकाला स्वतंत्र व स्वावलंबी बनविण्यासाठी स्त्री शिक्षणाबाबत आग्रही, ठाम व निश्चयी भूमिका मांडणारे महर्षि कर्वे. समाजातील 'स्त्री' हा घटक या काळात पूर्णतः दुर्लक्षित व उपेक्षीत होता. त्या समाजातील स्त्री शक्तीला सामर्थ्यपणे घडविण्याचे महत्वपूर्ण कार्य कर्वे यांनी केले. समाजातील विधवा स्त्रियांचे दुःख दुर करणे गरजेचे आहे. असे महर्षी कर्वे यांना वाटले. त्यासाठी त्यांनी विधवा विवाहाचा आग्रहाने पुरस्कार केलाः

विधवा विवाहाला चालना मिळावी म्हणून दि. ३१ डिसेंबर १८९३ रोजी त्यांनी ‘विधवाविवाहोत्तेजक मंडळी’ या संस्थेची स्थापना केली या संस्थेमार्फत पुर्नविवाहाचे कुटुंब मेळावे भरविण्यास प्रारंभ केला. पुढे दि. २० ऑगस्ट १८९५ रोजी या संस्थेच्या विधवा ‘विधवाविवाहोत्तेजक मंडळी' या नावात बदल करण्यात येऊन विधवा विवाह प्रतिबंध निवारक मंडळी असे नामकरण केले गेले. पुणे येथे पेरुच्या गेटाजवळ गोरे यांच्या बाड्यात दि.१४ जून १८९६ रोजी अनाथ बालिकाश्रमाला सुरुवात केली. स्त्रियांना त्यांच्या दैनंदिन जीवनात उपयोगी पडेल आणि त्यांच्या स्वभावाला पोषक ठरेल अशा प्रकारचे शिक्षण देण्याच्या उद्देशाने कर्वेनी दि. ४ मार्च १९०७ रोजी पुणे येथे 'महिला विद्यालयाची स्थापना केली.

**राजा राममोहन रॉय :-**

समाजसुधारणेच्या माध्यमातून राजा राममोहन रॉय यांनी महिला सक्षमीकरणाला वाचा फोडली. त्यांनी हिंदु धर्मातील अनेक बुरसटलेल्या रुढी, प्रथा, परंपरा, चालिरिती कशा प्रकारे स्त्रियांच्या क्षमतांना निर्बंधित करतात हे दाखवून दिले. तसेच, त्या काळात चालू असलेली सतीची चाल, बहुपत्नित्व, स्त्रियांना धर्माच्या व अंधश्रद्धेच्या नावाखाली तत्कालीन पुरुषसत्ताक प्रतिगामी समाजाकडून मिळणारी क्रूर व हिंसक वागणूक, या व अशा प्रकारच्या स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचाराविरोधात ब्रिटिश सरकारच्या मदतीने काही महत्त्वपूर्ण कायदे केले. धर्मसुधारणावादी भुमिका हा या महिला सक्षमीकरणाच्या प्रक्रियेतील महत्त्वाचा टप्पा राहिला आहे. त्यामुळेच त्या नंतरच्या टप्प्यावरखेखील आपल्याला सत्यशोधक समाजाचा सार्वजनिक सत्यधर्म पहावयास मिळतो.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर:-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे वेगवेगळ्या चर्चा, परिषदा, मेळावे, पत्रके इत्यादी प्रसार माध्यमांद्वारे भारतीय समाज व्यवस्थेतील जात, वर्ण, धर्माची मुळ किती खोलवर रुजली आहेत, यांबाबत आपली भूमिका मांडत असत. प्रस्थापित वर्गाने अनेक जाचक रुढी, प्रथापरंपरा, चालिरिती निर्माण केल्या आहेत. त्याचाच परिणाम म्हणून येथील दलित, आदिवासी, महिला

© 2024, SK Publisher All Rights Reserved

इत्यादी उपेक्षित घटकांना त्यांचे अस्तित्व व स्वातंत्र्य अबाधित ठेवता येत नाही. त्यामुळे 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' असा ईशाराही बाबासाहेबांनी समाजाला दिला. महिलांच्या राहणीमानाबद्दल ते म्हणत की, इतर महिलांप्रमाणे वलित महिलांनी देखील पुर्ण वस्त्रे परिधान करावीत. तसेच, महिलांनी सक्षमतेसाठी शिक्षण व रोजगाराच्या क्षेत्रात पुढाकार घ्यावा. एवढेच नव्हे तर, पारंपारिक रुढी, प्रथा व परंपरांना झुगारुन द्यावे. दलित महिलांच्या सक्षमीकरणामध्ये बाबासाहेबांचे योगदान अतिशय मोलाचे वाटते. त्यांनी स्त्रियांना 'हिंदू कोड बीला' द्वारे संधी मिळवून देण्याचा प्रयत्न केला.

स्वतंत्र भारतात कित्येक अधिकार महिलांना बाबासाहेबांमुळे मिळाले आहेत. या अधिकारांमुळे महिलांना हक्क, प्रतिष्ठा, दर्जा प्राप्त झाला कारण समाजात स्त्री -पुरुष दोन्ही घटक महत्वाचे आहेत.

**महात्मा गांधी, सावित्रीबाई फुले, न्या. गोविंद रानडे, विद्यासागर ईश्वरचंद्र, सयाजिराव गायकवाड, ताराबाई शिंदे, रमाबाई रानडे, काशीबाई कानेटकर, आनंदीबाई जोशी,** इत्यादि अनेक भारतीय सुधारकांनि स्त्री सक्षमीकरणात महत्वाची भूमिका आहे.

**संदर्भ**

राजकीय विचार प्रणाली – डॉ नितीन विरमाल, डॉ वैशाली पवार

लिंगभवाचे समाजशात्र – यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ

स्त्रीवाद – सुमती लांडे

महात्मा फुले – धनंजय किर

महाराष्ट्रचे शिल्पकार पंडिता राम बाई – डॉ सिसिलिया कार्व्हलो

सामाजिक चळवळी ( परंपरागत आणि नवीन ) – डॉ. एस.जी.देवगांवकर, डॉ. सौ. शैलजा देवगावकर, डॉ. सौ. जयमाला डुमरे

:::. Cite this article .:::

धारस्कर सारंग राजेंद्र, & शेळकेप्रा. डॉ. अरुण मुकुंदराव. (2024). स्त्रीवाद आणि भारतातील सामाजिक व राजकीय सुधारकांची महिला सक्षमीकरणातील भूमिका. SK International Journal of Multidisciplinary Research Hub, 11(12), 533–540. https://doi.org/10.61165/sk.publisher.v11i12.104